# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 20/06/2023 (मंगळवार) सकाळ

### जिवानिशी ठार करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

पो.स्टे. पारशिवनी :– फिर्यादी नामे– शेषराव गुंडेराव काकडे, वय ५२ वर्ष रा. ईटगाव ता. पारशिवनी यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. पारशिवनी येथे अप. क्र. २२३/२०२० कलम ३०२, २०१ भादवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

यातील **मृतक नामे– सौ. ममता जगु धुर्वे, वय ४० वर्ष रा. ईटगाव ता. पारशिवनी** व आरोपी नामे– जगु सनक धुर्वे वय ४५ वर्ष, रा. ईटगाव ता. पारशिवनी हे पती–पत्नी असुन यातील आरोपीने मृतक (पत्नी) हीला दुसऱ्या व्यक्तीसोबत का बोलते असे म्हणुन तिचे चारीत्र्यावर संशय घेवुन दोघांमध्ये नमुद कारणावरुन भांडण होवुन आरोपीने मृतकचा गळा व नाक दाबुन जिवानीशी ठार केले.

सदर प्रकरणाचे तपास सहायक पोलीस निरीक्षक श्री. नितेश गोहणे यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. डी. जे. ५ लाडेकर सा. कोर्टामध्ये सादर केले. आज दिनांक २०/०६/२०२३ रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश श्री. लाडेकर सा. यांनी वरील नमुद आरोपीस कलम ३०२ भादवि. मध्ये आजिवन कारावास व १०००/– रु. दंड. दंड न भरल्यास ०१ महीना साधी कैद. तसेच कलम २०१ भादवि मध्ये ३ वर्ष सश्रम कारावास व १०००/–रु. दंड. दंड न भरल्यास ०१ महीना साधी कैद अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी गनगने मॅडम यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अधिकारी म्हणुन पोहवा/१३८६ शैलेंद्र रामटेके पो.स्टे पारशिवनी यांनी मदत केली आहे.

### दरोडयाचा प्रयत्न

पो.स्टे. उमरेड :– अंतर्गत बुट्टीबोरी रोड कान्वहा शिवारात मकरधोकडा रोड येथे दिनांक १९/०६/२०२३ चे ०३.५० वा. दरम्यान यातील **आरोपी नामे– १) गुलाब अकबर वालीद अब्बुल हमीद सीध्दीकी, वय २७ वर्ष २) मोहम्मद नुरतास पालीद सलीम सीध्दीक, वय २३ वर्ष, दोन्ही रा. वार्ड क्र. ०१ माजरी जि. चंद्रपुर ३) आकाश चरणदास साबळे, वय २० वर्ष ४) राहुल देवराव साबळे, वय २० वर्ष ५) विधी संघर्ष ग्रस्त बालक वय १७ वर्ष ६) विधी संघर्ष ग्रस्त बालक वय १६ वर्ष सर्व रा. एकता नगर माजरी** हे संशयास्पद स्थीतीत दिसुन आल्याने त्यांची झडती घेतली असता आरोपीतांच्या ताब्यात जप्त मदुदेमाल मिळुन आला असुन सदर आरोपी हे दरोडा घालण्याच्या पुर्व तयारीने मिळुन आल्याने आरोपीतांच्या ताब्यातून १) स्प्लेंडर प्लस कंपनीची दुचाकी वाहन क्र. एम. एच.– ३४ बी. एस. –७७९४ किंमती अंदाजे ३००००/– रू. जीच्या हॅन्डेलला लटकवलेली निळया रंगाची पांढरा कवर असलेली स्कुल बॅग किंमती अंदाजे २००/–रू. ज्यामध्ये कंपनीचे पिवळया रंगाचे ०९ नग ब्लेड किंमती अंदाजे १५०/– रू. व एक पिवळया रंगाची ब्लेड लागलेली मोठी आरी लाकडी मुठ असलेली सॅमसंग कंपनीची किंमती अंदाजे १२०/– रू. एक पांढऱ्या रंगाचा नटराज कंपनीची मोठा पेपर कट धारदार चाकु किंमती अंदाजे ८०/– रू एकुण ३०५५०/– रू २) पांढऱ्या रंगाची डुएट क्र. एम. एच.– २९ ए. व्ही. –९१७४ जीचा मागचा टायर हवा नसलेल्या स्थीतीत किंमती अंदाजे ५००००/– रू. जीच्या डीक्कीमध्ये एक लहान आडजात दोडा असलेली धारदार कुहाडा किंमती अंदाजे १००/– रू. दोन नग पाने किंमती ५०/– रू. एक हीरव्या रंगाची पॅन्ट किंमती २००/– रू. दोन वाघमारे लाल मिरची पावडर असे लिहलेले सिलबंद पॉकेट किंमती ३०/– रू. एक नारळाची दोरी जीची लांबी अंदाजे १५ ते

२० मिटर किंमती २००/— रू. असा एकुण ५०७१०/— रू. असा एकुण ८१२६०/— रूपयाचा मुद्देमाल मिळुन आला.

सदर प्रकरणी सरतर्फे फिर्यादी नामे— पोहवा /४८६ प्रदिप चवरे वय ३७ वर्ष रा. पोलीस स्टेशन उमरेड यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपीतांविरुध्द कलम ३९९ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक बट्टुलाल पांडे मो. क्र. ९७६३७०७९८४ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर